**नि. फौ. खटला क्र.५१/२०१८**

**निशाणी क्र.४२**

**:: अभियोग पक्षातर्फे सा.क्र.०३ चा पुरावा ::**

**शपथेवर सत्य निवेदन करतो की,**

**माझे नांव** : बजरंग व्यंकटराव मोरे,

**वय** : ४६ वर्षे, **धंदा** : शेती,

**राहणार** : शेंद (द.), ता. शिरूर अनंतपाळ, जि. लातूर.

**:: अभियोग पक्षातर्फे सरतपासणी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस.एम. हाशमी यांचेमार्फत ::**

दि.१४/०६/२०१७ रोजी सकाळी १०.०० ते ११.०० वाजताच्या दरम्यान मी शेतात होतो. त्यावेळी पोलीस शेंद दक्षिण येथील सर्वे नं.३२ मध्ये आले होते. त्यांनी मला तेथे बोलावले होते. पोलीस आणि माझी चुलती मोरे यांनी मला घटनास्थळ दाखविले होते. पोलिसांनी तेथे माझी फक्त सही घेतली होती व मी तेथे काही बघितले नाही. मी पंचनामा वाचला नव्हता. मी पंचनामा वाचून सही केली नव्हती. आता मला नि.३७ वरील पंचनामा दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यामधील मजकूर मला माहीत नाही.

०२. **साक्षीदार पूर्वीच्या कृतीवर कायम नसल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या तोंडी विनंतीवरून साक्षीदारास उत्तरसूचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात येते.**

०३. पोलिसांनी माझ्यासमोर पंचनामा लिहिल्याचे घडले. परंतु मी पंचनामा वाचून सही केली नव्हती. आरोपी संदिपान माझे चुलते आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना मदत करण्यासाठी खोटी साक्ष दिली.

सरतपास पूर्ण.

**:: आरोपी क्र.१, २ व ४ करिता उलटतपास अधिवक्ता श्री. एम.एस. नागराळे यांच्यामार्फत ::**

०४. हे म्हणणे खरे आहे की, दि.१४/०६/२०१७ रोजी सकाळी १०.०० ते ११.०० वाजताच्या दरम्यान मी माझ्या शेतात काम करीत होतो. पोलीस कशासाठी

शेतात आले होते हे मला माहीत नव्हते. पोलिसांनी मला त्या अनुषंगाने काहीही सांगितले नव्हते. पोलिसांनी मला सही करण्यासाठी शेतात बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी पंचनामा लिहिला किंवा कसे हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी फक्त पंचनाम्यावर सही केली होती. माझी चुलती मोरे यांनी माझ्यासमक्ष घटनास्थळ दाखविल्याचे घडले नाही.

उलटतपास पूर्ण.

:: **आरोपी क्र.३ व त्यांचे अधिवक्ता श्री. एस.बी. पाटील यांचा वारंवार पुकारा केला असता ते गैरहजर आहेत. त्यांनी उलटतपास घेण्यास कसूर केला. सबब उलटतपास नाही.** ::

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत　　　　　　　　　सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे )　　　　　　　　　( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**.　　　न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**.

दि.११/०२/२०२६.